**वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ “अवलंबित्व” ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारण्याबाबत.................. शासकीय कर्मचाऱ्यांचे आईवडील आणि अविवाहित व घटस्फोटीत बहिणींसंदर्भात.**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१७/प्र.क्र.६१४/राकावि-२

१० वा मजला, गोकूळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन इमारत मंत्रालय, मुंबई.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१९.

**वाचा -**

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९२/६३४/प्र.क्र.६५/आरोग्य-७, दिनांक २१ ऑगस्ट, १९९२.**
२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९९/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक १८ ऑगस्ट,१९९९.**
३) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९९/प्र.क्र.९९/आरोग्य-३, दिनांक २० फेब्रुवारी, २००३.**
४) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दिनांक ११ नोव्हेंबर, २०११.**

**प्रस्तावना -**

वरील (४) येथील आदेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार सद्य:स्थितीला (अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या आईवडीलांना (i) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा, (ii) निवृत्तीवेतन मिळत नसेल तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा, (iii) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे, दरमहा-३,५००/- इतके मूळ निवृत्तीवेतन घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रुपये ३,५००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबित असल्याचे मानले जाते आणि त्यांच्या आजारपणावरील उपचारांच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ठरते. सदर तरतूद शासकीय कर्मचाऱ्यांच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्याच्यावरील अवलंबित्व ठरविताना तसेच महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिच्या आईवडीलांऐवजी सासू-सासऱ्यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासू-सासऱ्यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागू ठरते. सातव्या वेतन

आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यात आल्यानंतर वरील मूळ निवृत्तीवेतन वा दरमहा कमाल उत्पन्नाची मर्यादा सुधारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

या संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-
अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या आईवडीलांना (i) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा, (ii) निवृत्तीवेतन मिळत नसले तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा, (iii) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे, दरमहा-रुपये ९,०००/- इतके मूळ निवृत्तीवेतन घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रुपये ९,०००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबित असल्याचे मानले जाईल.

ब) वरील तरतूद शासकीय कर्मचाऱ्यांच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्यांच्यावरील अवलंबित्व ठरविताना तसेच महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिच्या आईवडीलांऐवजी सासू-सासऱ्यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासू-सासऱ्यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागू असेल.

२. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू असतील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक.२६/सेवा-५, दिनांक २३ एप्रिल, २०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०३०९५४५७३७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind Changoji Bhise

Digitally signed by Govind Changoji Bhise
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PHD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9596d652d5b6cb0f88e4c39c6c2adf97629debbf12176865f2683a6eb9318e8, cn=Govind Changoji Bhise
Date: 2019.08.02 17:22:14 +05'30'

**डॉ. गोविंद भिसे**
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,(सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

४) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७) मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लँड रेकॉर्डस, पुणे,
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) मुंबई,
१६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) चीफ ऑडिटर लोकल फंड्स अकाऊंटस, मुंबई,
२०) सर्व कोषागार अधिकारी,
२१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
२२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
२३) संचालक, आयुर्वेद, मुंबई,
२४) संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
२५) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉपॅारेशन, परेल, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
२७) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
२८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३०) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
३१) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३२) प्रोथोनेटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३३) वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,
३४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,

३५) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई,

३६) निवड नस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यांत येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच, संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.